# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०५/२०१८

**१) संगनमत करुन शेतीचे विक्री पत्राचे कारणा वरून इसमास तिक्ष्ण हत्याराने वार करून जिवानीशी ठार केल्याने गुन्हानोंद:–**

दिनांक १९/०५/२०१८ चे १९.४६ वाजता दरम्यान यातील मृतक दुधराम मुरारी करंबे वय ५७ वर्ष रा. बेलघाटा वार्ड पवनी हा कोसाबोडी रिठी परीसरात असलेल्या स्वतःच्या मालकीचे गायत्री मंदीरात जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून मृतकाला अडवुन शेतीचे विक्री पत्राचे कारणावरून फिर्यादीचा काका मृतक याचे पोटावर डावे बाजुस तिक्ष्ण हत्याराने वार करून जिवानीशी ठार केले असे फिर्यादी संदिप गुलाबराव देशमुख वय २६ वर्ष रा. बेलघाटा वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०२,३४१,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. चकाटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२)ऑटो चालकांच्या निष्काळजीपणे ऑटो पलटी होवुन इतर स्त्री वपुरुषांना जखमी करुन वएका महिलेच्या मृत्युस कारणीभुत झाल्याने :–**

दिनांक २०/०५/२०१८ चे ०९.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी ऑटोचालकाने त्याचे ऑटो मध्ये प्रवासी बसवुन ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन वाहन पलटी केल्याने, वाहनातील बसलेल्या स्त्री पुरूष यांना जखमी करण्यास व श्रीमती शोभा वंसता गजबे वय ६२ वर्ष रा. आंबाडी हिचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी जितेंद्र वंसता गजबे वय २९ वर्ष रा. आंबाडी सिल्ली याचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) स्वराज माजदा गाडी चालकाने गाडी हयगयीने चालवुन एसटी बसला धडक देवुन नुकसान केरुन वाहनघेवुनपळुन गेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०५/२०१८ चे १०.१० वाजता दरम्यान यातील फिर्यादी दिलीप प्रभाकर डोरलीकर वय ४३ वर्ष रा. तुकडोजी वार्ड भंडारा हे त्याचे ताब्यातील एस.टी. बस. क्र. एमएच ०७ सी. ०३६८ ही भंडारा ते अर्जुनी मोरगाव च्या अलिकडे विरूध्द आरोपी ऑटो चालकाने त्याचे ताब्यातील स्वराज माजदा गाडी हयगयीने चालवुन एसटी बसला सानगाव येथे कट मारल्याने एसटी बसचे अंदाजे १०,०००/–रु. चे नुकसान करुन वाहन घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी दिलीप प्रभाकर डोरलीकर वय ४३ वर्ष रा. संत तुकडोजी वार्ड एल. आय. सी. ऑफीसचे मागे सुरेश देहेकार यांचे घरी भंडारा (एसटी चालक) यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,४२७ भादवी. सहकलम १३४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गभणे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत

**४) मोटार सायकल चालकांने समोरुन येणाऱ्या मोटार सायकलला धडक देवुन स्वतःचे मरणास व दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०५/२०१८ चे १७.२४ वाजता दरम्यान यातील जखमी क्र. १ संनिल गंगाराम देवघरे वय २५ वर्ष, रा. मांदेळ व जखमी क्र. २ दिनकर दयाराम गोमासे वय ३६ वर्ष, रा. नेरला हे त्याचे ताब्यातील नंबर नसलेली टिव्हीएस मोटार सायकलने मांढळ कडुन भागळी कडे त्याचे बाजुने येत असता भागळी वरुन मांढळ कडे येणाऱ्या यातील आरोपी मृतक पॅशन प्रो चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल घटना स्थळा वरील वळणावर रॉग साईडने भरधाव वेगाने चालवुन समोरुन येणा–या वरील नमुद मोटार सायकलने जोरदार धडक दिली व अपघातास कारणीभुत होवुन स्वतःचे मरणास तसेच यातील २ जखमी ईसमांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान सरतर्फे फिर्यादी पोहवा. भलावी याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**५) महीन्द्रा कार लापरवाहीने चालवुन ट्रक डिजेल टॅकला धडक दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०५/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी प्रशांत नत्थुजी मोहुर्ले वय ३८ वर्ष, रा. गोकुळ नगर बल्लारशा जि. चंद्रपुर हा त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एमएच ३४ एव्ही २५३७ हा जेल रोड कडुन राजीव गांधी चौकातनु नागपुर नाक्या कडे वळत असतांना त्याचे मागेहुन येणारी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगयीने, लापरवाहीने चालवुन ओव्हरटेक करतांनी फिर्यादीचे ट्रक चे डिजेल टॅकला धडक मारल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु :—**

दिनांक २०/०५/२०१८ चे १३.१५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. शगुनाबाई भाऊराव नगरधने वय ५५ वर्ष, रा. भगतसिंग वार्ड टाकळी हिची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आकस्मीक विभागात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. फुंडे यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) छाती दुखत असल्याने पोलीस नाईक यांचा मृत्यु :—**

दिनांक २०/०५/२०१८ चे ०५.४५ वाजता दरम्यान यातील मृतक पोना. जंयत विठ्ठलराव घागी पोस्टे लाखांदुर यांची दिनांक २०/०५/२०१८ ला छाती दुखत असल्याने प्रकृती खराब झाली होती त्यास ग्रामीन रुग्नालय लाखांदुर येथे प्रथम उपचार करुन पुढील उपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे आकस्मीक विभागात भरती केले असता तेथील डॉक्टराने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. ऊईके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**८) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २०/०५/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी धनश्री कैलास वलथरे वय २८ वर्ष, रा. विहीरगाव हिचे पती मृतक कैलास मारोती वलथरे वय ३१ वर्ष, रा. विहीरगाव यांची अचानक प्रकृती बिघडल्याने मरण पावल्याची लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चनाब पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**९) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक २०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व वरठी येथे अवैध देशी, हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभंट्टी दारू +१७६० किलो सडव मोहा + साहित्य किमती १,५३,६००/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता— ०२ ईतर वाहनांवरती — ११६ केसेस करण्यात आले आहे.

21-5-18

(डी.डब्ल्यु मंडलवार)

**प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)**

**दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता